3

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण    **P.S.(ठाणे):** सांगोला
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0555    **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/07/2024 22:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार    **Date From (दिनांक पासून):** 22/07/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/07/2024
      **Time Period (कालावधी):**    **Time From (वेळेपासून):** 11:25 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:39 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेलं पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 22/07/2024    **Time (वेळ):** 22:20 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 039
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/07/2024 22:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पश्चिम, 2 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सांगोला पोलीस ठाणे व, एपी फोटोस्टूडीओ वासूद,रोड सांगोला ता सांगोला

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. संतोष कृष्णा पवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क्रार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपोवाटंबरे, ता सांगोला,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपोवाटंबरे, ता सांगोला,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9881433512

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि ब.नं. 2036 श्री. सोमनाथ बबन माने | | | 1. सांगोला पोलीस ठाणे,सांगोला, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अक्षय दत्तात्रय पवार | | | 1. वाटंबरे ता सांगोला,सांगोला, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 22/07/2024

मी श्री. संतोष कृष्णा पवार, वय 40 वर्षे, धंदा शेती व दुग्ध व्यवसाय, रा. लक्ष्मीनगर, मु.पो.वाटंबरे, ता. सांगोला, जि. सोलापूर. मो.नं. 9881433512.समक्ष हजर राहून फिर्याद देतो की,

मी दि. 22/07/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री गणेश कुंभार यांना फोन करुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. पोउपअधी श्री. कुंभार यांनी माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता दोन शासकीय पंचासह सांगोला येथे येत असल्याचे सांगून मला सोलापूर-कोल्हापूर रोडवरील सांगोला जवळील चिंचोली ब्रीज खाली थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी थांबलो असता, काही वेळाने तेथे पोउपअधी श्री. कुंभार हे दोन पंच व सापळा पथकासह सदर ठिकाणी शासकीय गाडीतून आले. सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता ती खालीलप्रमाणे असल्याचे सांगितले.

दि. 14.07.2024 रोजी माझा मोठा मुलगा अक्षय व माझा सख्या चुलत भाऊ श्री. दत्तात्रय एकनाथ पवार यांचेत जुन्या कारणावरुन झालेल्या भांडणात श्री. दत्तात्रय पवार हे गाडीवर पडून त्यंाचे डोक्याला मार लागल्यामुळे त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माझे तसेच माझा मोठा मुलगा अक्षय व लहान मुलगा साहिल ऊर्फ बबन, वय 16 वर्षे यांचे विरोधात सांगोला पोलीस ठाणे येथे एफआयआर नं. 538/2024, बीएनएस कलम 118(1), 115(2),352,351(2),351(3),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचे गुन्हयामध्ये कलम वाढ न करुन अटक न करता जामीनावर सोडण्यासाठी व सदर गुन्हयाचे तपासामध्ये मदत करण्यासाठी म्हणून सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस सोमनाथ माने हे फोटोग्राफर खाजगी इसम अक्षय पवार यांचे मार्फतीने 45,000/- रु. लाच मागणी करीत असल्याची व सदरबाबत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.

त्यानंतर पोउपअधि श्री. कुंभार यांनी पोलीस सोमनाथ माने यांची समक्ष भेटुंन पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून, त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर पोउपअधि श्री. कुंभार यांनी मला तसेच पंच 01 श्री. क-हाळे यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या गळ्यात अडकवून मला व पंच क्र. 01 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन सांगोला पोलीस ठाणे येथे जाणेकरीता पाठविले. सदर ठिकाणी मी, पंच क्र. 01 श्री. क-हाळे असे सांगोला पोलीस ठाणे येथे जावून पोलीस सोमनाथ माने यांची भेट घेतली. त्यावेळी पोलीस सोमनाथ माने हे साध्या वेशात होते. आमच्यामध्ये प्रथम माझे व माझ्या मुलांचे विरोधात दाखल असलेल्या वर नमूद गुन्हयाचे अनुषगांने बोलणे झाले व पोलीस सोमनाथ माने यांनी आमच्या विरोधात दाखल असलेल्या गुन्हयामध्ये कलम वाढ न करुन, अटक न करता जामीनावर सोडण्यासाठी व सदर गुन्हयाचे तपासामध्ये मदत करण्यासाठी म्हणून तिघांचे प्रत्येकी 10,000/- रु. असे एकुण 30,000/- रुपये लाचेची मागणी केली, त्यावेळी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता, सुरुवातीस त्यांनी आयओला पण दयावे लागतात असे सांगून नकार देवून, पुन्हा 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर रक्कम खाजगी इसम अक्षय पवार यांना देण्यास सांगूण, मला त्याचा मोबाईल नंबर दिला व तेथे गेल्यानंतर मला त्यांना फोन करण्यास सांगीतले. त्यावेळी मी पोलीस सोमनाथ माने यांचेकडून अर्धा-पाऊण तासाचा वेळ मागून पंच 01 यांच्यासह पोउपअधी श्री. कुंभार व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोउपअधि कुंभार यांनी मला व पंच 01 श्री. क-हाळे यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण खात्री केली. त्यावेळी पोउपअधी श्री. कुंभार यांनी मला सदर

विचारले असता, मी त्यांना आमचे विरुध्द दाखल असलेल्या
गुन्हयाचे तपासी अंमलदार कोण आहेत असे विचारले असता, मी त्यांना आमचे विरुध्द दाखल असलेल्या
गुन्हयामध्ये सुरुवातीपासून पोलीस सोमनाथ माने हेच संपर्क करीत असून सदर गुन्ह्याचे तपासी अंमलदार तेच
असावेत असे सांगीतले.

त्यानंतर पोउपअधि कुंभार यांनी पोलीस सोमनाथ माने व खाजगी इसम अक्षय पवार यांचेवर सापळा
कारवाई करण्याचे ठरवीले. त्यावेळी मी पंचासमक्ष 25,000/- रु. हजर केले. पोउपअधि कुंभार यांनी सदर
25,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून, सापळा पूर्व कारवाई पूर्ण केली. सदर लाच रक्कम माझे
शर्टच्या वरील डाव्या खिशामध्ये ठेवली. पोउपअधि कुंभार यांनी खाजगी इसम अक्षय पवार याची भेट घेण्याचे
अनुषंगाने त्यास फोन करण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी माझ्या वर नमूद मो.नं.वरुन फोटोग्राफर अक्षय पवार याचे
मो.नं. 9172694913 वर फोन केला, त्याच वेळी पोउपअधि श्री. कुंभार यांनी त्यांचे कडील व्हाईस रेकॉर्डर सुरु
करुन आमच्या मधील संभाषण रेकॉर्डींग करुन घेतले. सदर संभाषणामध्ये अक्षय पवार यांने पैसे घेवून त्याचे वासूद
रोडवरील एपी फोटो स्टुडीओ येथे घेवून येण्यास सांगीतले. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील
अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोउपअधि कुंभार यांनी योग्य त्या सुचना दिल्या. व सापळा पथकातील
दोन पोलीस अंमलदार यांना सांगोला पोलीस ठाणे येथे पाठवून पोलीस सोमनाथ माने याचे हालचालीवर लक्ष ठेवून
पुढील आदेशाप्रमाणे काम करण्याची सूचना देवून त्यांना रवाना केले. त्यानंतर फोटोग्राफर खाजगी इसम अक्षय
पवार यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन, तो माझ्या गळ्यात अडकावून मला व
पंच क्र. 01 श्री. क-हाळे यांना माझ्या दुचाकी वरुन त्याचे वासूद रोडवरील एपी फोटो स्टुडीओ येथे भेट घेण्यासाठी
पाठविले. व आमचे पाठोपाठ पोउपअधि कुंभार, पंच क्र. 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवून परिसरात
सापळा लावून थांबले. सदर ठिकाणी जावून मी अक्षय पवार याची भेट घेवून त्यास माने साहेबांनी पाठवील्याचे
सांगीतले. त्यावेळी मला देखील साहेबांचा फोन आला असल्याचे सांगून माझ्याकडे इशा-याने पैशाची मागणी केली.
त्यावेळी मी माझ्याशर्टाच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून अक्षय पवार याचे
समोर धरुन मोपुन घ्या असे म्हणालो असता, त्यांनी ती लाच रक्कम त्याचे उजव्या हाताने स्विकारुन मोजुन त्याचे
नेसत पॅण्टच्या उजव्या बाजूच्या पुढील खिशात ठेवली. त्यावेळी मी पोउपअधि कुंभार यांना फोन करुन लाच
स्वीकारल्याचा इशारा केला. त्याप्रमाणे पोउपअधि श्री. कुंभार, पंच क्र. 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी
येवून फोटोग्राफर अक्षय पवार यास रंगेहात पकडले. व त्यास त्याचे नाव गांव विचारुन सदरची रक्कम कोणासाठी
घेतली आहे असे विचारले असता, त्यांनी त्याचे नाव अक्षय दत्तात्रय पवार, वय 27 वर्षे, धंदा फोटोग्राफर, रा.
लक्ष्मीनगर, मु.पो. वाटंबरे, ता. सांगोला, जि. सोलापूर असे असल्याचे व सदरची रक्कम सांगोला पोलीस स्टेशनचे
पोलीस सोमनाथ माने यांचे सांगण्यावरुन त्यांचे गावात राहणारे संतोष पवार व त्यांची मुले यांचे विरुध्द सांगोला
पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करता मदत करण्यासाठी पोलीस सोमनाथ माने
यांच्यासाठी घेतली असल्याचे सांगीतले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासणी करुन,पोउपअधि
श्री. कुंभार यांनी सांगोला पोलीस ठाणे जवळ असलेल्या सापळा पथकातील पोशि/766 गजानन किणगे यास फोन
करुन पोलीस सोमनाथ माने यास ताब्यात घेण्यास सांगीतले. व ते सापळा पथक, पंच व खाजगी इसम अक्षय पवार
यांचेसह शासकीय वाहनाने सांगोला पोलीस ठाणे येथे गेले व मला माझ्या मो. सायकलवरुन तेथे येण्यास सांगीतले.
सांगोला पोलीस ठाणे येथे आल्यानंतर पोलीस सोमनाथ माने यास त्याचे नाव व पत्ता विचारुन, लाच रक्कमेबाबत
विचारपूस करता, त्यांनी त्यांचे नाव श्री. सोमनाथ बबन माने, पोलीस शिपाई, ब.नं. 2036, नेमणूक सांगोला
पोलीस ठाणे असे सांगून, सध्या त्यांचे नेमणूक नाझरे पोलीस बिट येथे असून, सदर ठिकाणी ते पोलीस हवालदार
श्री. क्षीरसागर, ब.नं. 264 यांचेकडे लेखणीक मदतनीस म्हणून काम करीत असून, माझ्या व माझे मुले यांचेवर
सांगोला पोलीस ठाणे येथे दाखल असलेला गुन्हा रजि नं. 538/2024, बीएनएस कलम 118(1), 115(2),
352, 351(2), 351(3), 3(5) प्रमाणे हया गुन्हयाचा तपास पो.हवा. 264 क्षीरसागर हे करीत असून, सदर
गुन्हयामध्ये कलम वाढ न करुन अटक न करण्यासाठी व गुन्ह्याचे तपासामध्ये मदत करण्यासाठी म्हणून माझ्याकडे
स्वता:साठी 25,000/- रु. लाच रक्कमेची मागणी करुन, सदर रक्कम खाजगी इसम अक्षय पवार यास
स्विकारण्यास सांगीतले असल्याचे पोशि सोमनाथ माने यांनी माझे व पंचासमक्ष सांगीतले आहे.

तरी आज दि. 22/07/2024 रोजीचे 11.25 वा. ते 13.39 वा. चे दरम्यान माझ्या व माझे मुले
यांचे विरोधात दाखल असलेल्या व पो.हवा. 264 क्षीरसागर यांचेकडे तपासास असलेल्या वर नमूद गुन्हयामध्ये
कलम वाढ न करुन, आम्हास सदर गुन्हयामध्ये अटक न करता जामीन देण्यासाठी व सदर गुन्हयाचा तपासामध्ये
मदत करण्यासाठी म्हणून पोशि, ब.नं. 2036 श्री. सोमनाथ बबन माने, नेम. नाझरे पोलीस दुरक्षेत्र, अंकित सांगोला
पोलीस ठाणे यांनी स्वता:साठी माझ्याकडे खाजगी इसम अक्षय दत्तात्रय पवार, रा. वाटबंरे यांचे करवी 45,000/-
रु. लाचेची मागणी करुन, पडताळणी कारवाईमध्ये प्रथम 30,000/- रु. लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती

25,000/- रु. स्विकारण्याची तयारी दर्शवून, सदर लाच रक्कम खाजगी इसम अक्षय दत्तात्रय पवार, रा. मुपो वाटंबरे, सांगोला, सोलापुर यांचे करवी स्वत:करीता स्वीकारुन त्यांनी सांपत्तीक फायदा मिळवून गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे. म्हणून माझी पोशि, ब.नं. 2036 श्री. सोमनाथ बबन माने व खाजगी इसम अक्षय दत्तात्रय पवार यांचे विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आलेला असून, तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(गणेश कुंभार)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Bhimarao Satyppa Khandale(I (Inspector)) / PBMAH75188 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
Name (नाव): Bhimarao Satyppa K
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PBMAH75188